# प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : महाराष्ट्रातील येरवडा, ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करणे हा केवळ आरोग्य व्यवस्थेचा विस्तार नसून, गुणवत्तापूर्ण उपचार, संशोधन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने टाकलेला दूरदर्शी आणि मानवकेंद्री पाऊल आहे. यामुळे समाजातील वंचित घटकांपर्यंत अधिक सक्षम, सुलभ आणि आधुनिक मानसिक आरोग्य सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प अधिक बळकट होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील येरवडा (पुणे), ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील चार प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालये समाजातील विशेषतः वंचित घटकांना मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा पुरवत आहेत. बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवांद्वारे ही रुग्णालये हजारो रुग्णांना उपचार देत असून, सुमारे ५७०० खाटांची सुविधा उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा व मनुष्यबळ आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने या रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आणला आहे. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात दर्जेदार उपचार सेवांसोबतच शिक्षण आणि संशोधनालाही चालना मिळणार आहे.

### केंद्र शासनाच्या योजनेशी सुसंगत उपक्रम

केंद्र शासनाच्या मॅनपॉवर डेव्हलपमेंट स्कीम अंतर्गत, स्ट्रेंथनिंग पीजी डिपार्टमेंट इन मेंटल हेल्थ स्पेशालिटिज (स्कीम बी) या योजनेनुसार मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत (एनएमएचपी) १२व्या पंचवार्षिक योजनेपासून या दिशेने विशेष भर देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी आधीपासून पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, अशा प्रादेशिक रुग्णालयांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

### शासन निर्णय आणि अभ्यासक्रमांची सुरुवात

राज्य शासनाने १६ सप्टेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करून खालील अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे:

एम.डी. सायकिॲट्री

एम.फिल क्लिनिकल सायकॉलॉजी

एम.फिल सायकियाट्रिक सोशल वर्क

डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग

हे अभ्यासक्रम प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे, पुणे (येरवडा) आणि नागपूर येथे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### नागपूर येथे एम.डी. सायकिॲट्रीला सुरुवात

प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून एम.डी. सायकिॲट्री अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील अध्यापकांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरू झाला असून, दरवर्षी ४ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात आहे. आजपर्यंत १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, त्यापैकी २ विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

### नर्सिंग क्षेत्रातही प्रगती

प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे व पुणे येथे डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग अभ्यासक्रम २०२२-२३ पासून सुरू करण्यात आला आहे.प्रत्येक ठिकाणी दरवर्षी २० विद्यार्थी प्रवेश घेत आहेत.आतापर्यंत ठाणे येथून ५९ आणि पुणे येथून ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित नर्सिंग कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढण्यास मदत होत आहे.

या चारही प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे पूर्णतः अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर केल्यामुळे पुढील फायदे अपेक्षित आहेत. रुग्णांना अधिक दर्जेदार आणि विशेषज्ञ उपचार सेवा. मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांची संख्या वाढ. संशोधन आणि नवोपक्रमाला चालना. ग्रामीण व वंचित भागांपर्यंत गुणवत्तापूर्ण मानसिक आरोग्य सेवा विस्तार होणार.

महाराष्ट्रातील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर हा केवळ आरोग्य क्षेत्रातील नव्हे तर शिक्षण आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीनेही एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून राबविण्यात येणारा हा उपक्रम राज्यातील मानसिक आरोग्य सेवांना नवे बळ देणारा ठरेल.

# सहकारी संस्थां यांनी मूल्य साखळी भागीदार निवडी करीता अर्ज करण्याचे आवाहन

सोलापूर :- राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया या नवीन अभियानाला मंजुरी दिली आहे. यात समूह आधारित कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सदर अभियानांतर्गत सोयाबीन, करडई, सुर्यफुल या पिकांसाठी सोलापुर जिल्हयाची निवड करण्यात आली असून राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया अंतर्गत जिल्हा तेलबिया अभियान समितीने निवड केलेल्या पिकनिहाय मूल्य साखळी भागीदार यांचे मार्फत समूहामध्ये प्रमाणित बियाणे वितरण, शेतकरी प्रशिक्षण व शेतकरी शेतीशाळा इ. घटक राबवायचे आहेत. तसेच मूल्य साखळी भागीदार यांना व्यवस्थापन खर्च, मूल्य साखळी समुहामधील शेतक-यांचे माती परिक्षण, सीड हब, BLOCK प्रात्यक्षिके, काढणीत्तोर सुविधा सहाय्य, कृषि मॅपरवर लाभार्थ्यांची माहिती भरणे इ. घटकांचा समावेश आहे. सन 2026-27 करिता पिकनिहाय मूल्य साखळी भागीदार यांची मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा तेलबिया अभियान समितीच्या मान्यतेने खालील निकषांच्या आधारे निवड करावयाची आहे.

निकष- मूल्य साखळी भागीदार (VCP) म्हणून निवड करावयाच्या शेतकरी उत्पादक कंपनी (FPCS) / सहकारी संस्थांसाठी पात्रता निकषः )

कंपनी कायदा किंवा सहकारी कायद्यांतर्गत नोंदणी केलेली असावी. ज्या तालुक्यात समुह तयार झाला आहे तेथे काम करण्याचा किमान 3 वर्षांचा अनुभव असावा. म्हणजेच नोंदणी माहे मार्च, 2023 पूर्वीची असावी.

किमान 200 शेतकरी उत्पादक कंपनी (FPCS) किंवा सहकारी संस्थेमध्ये नोंदणीकृत असावेत. सहकारी संस्था असल्यास संस्थेच्या उद्दिष्टांमध्ये तेलबिया पिकांत कामकाजाबाबत नमूद असावे. मागील 3 वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल 9 लाख रुपयांपेक्षा जास्त असावी. शेतकरी उत्पादक कंपनी (FPCS) मध्ये शेतकऱ्यांचा किमान 3 लाख रुपयांचा समभाग असावा. शेतकरी उत्पादक कंपनी / सहकारी संस्था प्राधान्याने कमी उत्पादकता असणा-या तालुक्यांमध्ये कार्यरत असावी. शासन अनुदानित शेतकरी उत्पादक कंपनी / सहकारी संस्था यांना प्राधान्य दिले जाईल. 10 हजार शेतकरी उत्पादक संघ (FPOS) योजनेंतर्गत तयार केलेले शेतकरी उत्पादक कंपनी (FPCS), NAFED, NSC-OS इत्यादी सार्वजनिक संस्थांकडे नोंदणीकृत तेलबियांशी संबंधित शेतकरी उत्पादक कंपनी (FPCS) यांना वरील पात्रता निकषांच्या पूर्ततेच्या अधीन राहून प्राधान्य दिले जाईल. तरी प्रस्तुत योजना मार्गदर्श सुचनांच्य अधीन राहून वरील निकषांचे पूर्तता करु शकणा-या इच्छुक शेतकरी कंपनी (FPCS)/ सहकारी संस्था यांनी सोयाबीन, सुर्यफुल व करडई या पिकांसाठी स्वतंत्रपणे दि. 30 मे 2026 पर्यंत वरील निकषांच्या पुर्तते करीता आवश्यक त्यासर्व कागदपत्रांसह तालुका कृषि अधिकारी कार्यालयास विहित नमुन्यात कंपनीच्या लेटर हेडवर संचालक मंडळाच्या ठरावासह अर्ज करण्यात यावा.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक रमिजराजा मेहताब शेख यांनी रईस अहमद मेहताब शेख यांच्या रुही ऑफसेट प्रिंटिंग सर्व्हिसेस, ३९/४० राजेश कोठे नगर, लक्ष्मी पेठ, सोलापूर (महाराष्ट्र) येथे छापून ३९/४०, राजेश कोठे नगर, सोलापूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
● संपादक : रमिजराजा मेहताब शेख ● मो. ७०२०३४१०५७ ●

OWNED AND PUBLISHED BY RAMIJRAJA MEHTAB SHAIKH, At 39/40, Rajesh Kothe Nagar, Solaprur, Dist. Solapur (Maharastra) PRINTED AT RUHI OFFSET PRINTING SERVICES, 39/40,Rajesh Kothe Nagar, Laxmi Peth, Solapur (Maharastra).
● EDITOR : RAMIJRAJA MEHTAB SHAIKH ● (Mobile 7020341057) ●



# आषाढी वारी यशस्वी होण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी समन्वय ठेवून कामे करावीत - जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन



***सर्व पालखीमार्ग वरील कायमस्वरुपी शौचालये त्वरित दुरुस्ती करून घ्यावीत**
***पंढरपूर नगर परिषद, पंढरपूर उप विभागीय अधिकारी, जिल्हा परिषद तसेच संबंधित विभाग यांनी आषाढी वारी साठी करावयाच्या विविध कामासाठी निधी मागणी प्रस्ताव तत्काळ सादर करा**
***मानाच्या पालख्या तसेच वारकरी, भाविक यांना उत्कृष्ट सोयी उपलब्ध करुन द्याव्यात**

सोलापूर, :- यावर्षी आषाढी एकादशी यात्रा दिनांक 25 जुलै 2026 रोजी पार पडणार असून ती शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून कामे करावीत. तसेच सर्व पालखी मार्ग व पंढरपूर शहरात वारकरी भाविकांना प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयीसुविधामुळे त्यांचे समाधान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले.

नियोजन भवन येथे आषाढी वारी 2026 नियोजनाबाबत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, पंढरपूर उप विभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, सार्वजनिक बांधकाम विभागाने अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्या सह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन पुढे म्हणाले की, आषाढी वारी 2026 मध्ये पालखी मार्गावर तसेच विसावा व मुक्कामाच्या ठिकाणी सुविधा निर्माण करण्यासाठी टेंडर प्रक्रिया राबवायची आहे अशा विभागांनी कामांची यादी 23 मे 2026 अखेरपर्यंत प्रशासनाला सादर करावी. त्यानंतर प्रशासनाच्या वतीने विधान परिषद निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर या कामांना सवलत देण्याबाबत मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच जिल्हा परिषद, पंढरपूर नगरपरिषद अन्य नगरपरिषद व विभागांना वारी कालावधीत विविध कामे करण्यासाठी निधी मागणीचे प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे शनिवारी सायंकाळपर्यंत प्राप्त झाले पाहिजेत. त्यानंतर त्या प्रस्तावावर पालकमंत्री महोदय यांची मान्यता घेऊन निधी मंजुरीची कार्यवाही करणे शक्य होणार आहे. त्याप्रमाणेच सर्व विभागांनी त्यांना कोणत्याही प्रकारची अडचण असेल तर त्वरित आपल्याशी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. आषाढी वारी ही कुंभ मेळाव्यानंतर सर्वात मोठी यात्रा आहे. तसेच प्रत्येक वारी नाविन्यपूर्ण असते त्यामुळे प्रत्येक यंत्रणांनी त्यांच्यावर असलेली जबाबदारीचे काटेकोरपणे नियोजन करावे असेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सुचित केले.

एसटी महामंडळाने यावर्षीच्या वारीसाठी राज्यभरातून 5400 बसेस ची व्यवस्था केलेली आहे तरी महामंडळाने त्यांच्या सर्व बसेसची तपासणी करून घ्यावी. त्या रस्त्यामध्ये कुठेही बंद पडणार नाहीत याची खात्री करावी. नेहमीप्रमाणे पंढरपूर शहरात तात्पुरते बस स्थानक उभारून त्या ठिकाणी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करावी व ते स्वच्छ राहील या दृष्टीने काटेकोरपणे नियोजन करावे अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या. अन्न व औषध विभागाने पंढरपूर शहर येथील सर्व हॉटेल्स किराणा दुकाने व अन्नपदार्थांची तपासणीसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करावे. कोणत्याही प्रकारचा अन्नपदार्थातून अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घ्यावी. तर पाटबंधारे विभागाने भीमा नदीपत्रात वारी कालावधीत आवश्यक पाणी सोडावे. भीमा नदीपत्रातील होड्यांच्या दृष्टीने योग्य ती दक्षता घ्यावी असेही त्यांनी म्हटले.

मंदिर समितीने तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील राहिलेली कामे त्वरित पूर्ण करून घ्यावीत. तसेच वारी कालावधीत पत्रा शेड तसेच भाविकांना आवश्यक सर्व सोयी सुविधा व्यवस्थित राहतील याची दक्षता घ्यावी. यावर्षीही वारी कालावधीत व्हीआयपी दर्शन बंद राहील असेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले. वारकरी भाविकांना दर्शन घेण्यात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही या दृष्टीने प्रयत्न करावेत.

संपूर्ण पालखी मार्ग, पालखीचे विसावा ठिकाणी, मुक्कामाचे ठिकाणी, पंढरपूर शहरात भक्ती सागर पत्रा शेड या ठिकाणी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था चांगली करावी. त्यावर स्वच्छतेसाठी पुरेशी मनुष्यबळ उपलब्ध करावे व पाण्याच्या टँकरची व्यवस्था करावी. तसेच ज्या ठिकाणी कायमस्वरूपी शौचालय आहेत त्या शौचालयांची संपूर्ण दुरुस्ती करून घ्यावी. इथे येणाऱ्या भाविकांना वारकऱ्यांना शौचालयाची चांगली व्यवस्था राहील या दष्टीने सर्व संबंधितांनी प्रयत्न करावेत असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

पालखी मार्गावरील अंगणवाडी शाळा प्राथमिक आरोग्य केंद्र त्यांच्या दुरुस्तीची आवश्यकता असेल तर निधी मागणीचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत. पोलीस विभागाने त्यांना आवश्यक असलेल्या 700 बँकेतील चा प्रस्ताव द्यावा. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने वारी कालावधीसाठी आवश्यक औषधी खरेदी वेळेत करावी. जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आरोग्य पथके तयार करावीत मोबाईल आरोग्य पथकेही तयार करावेत. पालखी विसावा ठिकाण व मुक्कामाच्या ठिकाणी पालखी गेल्यानंतर तात्काळ त्या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी केल्या.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पालखी महामार्गावर ग्रामीण भागात पालखी व भाविकांना सोयी सुविधा देण्यासाठी 61 कोटीच्या निधीचा आराखडा तयार केलेला आहे. या अंतर्गत दहा हजार मोबाईल टॉयलेट, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी तसेच अन्य 22 ठिकाणी जर्मन हँगर मंडप उभारला जाणार आहे. यातून वारकऱ्यांना आरोग्य सुविधा, चार्जिंग स्टेशन, पाणीपुरवठा, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी मुरमीकरण रस्ते आदी कामे प्रस्तावित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी माळशिरस उपविभागीय अधिकारी विजया पांगरकर यांनी पालखी मार्गावर केलेल्या व आवश्यक असलेल्या सुविधांची माहिती दिली. पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी महेश रोकडे यांनी नगर परिषदेच्या वतीने पंढरपूर शहरात भाविकांसाठी नियोजित असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. यामध्ये भक्ती सागर येथे एक हजार ऐंशी कायमस्वरूपी टॉयलेट उभारलेले आहेत व वाखरी पालखी तळावर दोन हजार मोबाईल टॉयलेट उपलब्ध केले जाणार आहेत. तर दोनशे सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तर मंदिर समितीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी भाविकांसाठी देण्यात येणार असलेल्या आरोग्य सुविधा, पाणी जेवण सुरक्षा यंत्रणा या अनुषंगाने सविस्तर माहिती दिली.

# ज्या लाभार्थ्यांचे कर्ज नाकारले जाते, त्यांना बँकेने लेखी स्वरूपात नेमके कारण कळविले पाहिजे- जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

*जिल्हास्तरीय बँक सल्लागार समितीची बैठक संपन्न

सोलापूर— जिल्हास्तरीय बँक सल्लागार समितीची बैठक जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक तसेच सर्व बँकांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत कर्जवितरणाची प्रगती, खातेउघडणीचे कामकाज आणि समितीने बँकांसमोर ठेवलेल्या उद्दिष्टांची अंमलबजावणी यांचा सखोल आढावा घेण्यात आला. तसेच ज्या लाभार्थ्यांचे कर्ज नाकारले जाते, त्यांना बँकेने लेखी स्वरूपात नेमके कारण कळविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सर्व बँकांनी नेमून दिलेले टारगेट शंभर टक्के पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे निर्देश देण्यात आले. उद्दिष्टपूर्ती वेळेत साध्य करण्यासाठी प्रभावी नियोजन करण्यावर भर देण्यात आला. तसेच प्रत्येक बँकेने 75 टक्के खाते उघडणीचे उद्दिष्ट पूर्ण करावे, अशी सूचना करण्यात आली. काही बँकांच्या कामकाजाबाबत असमाधान व्यक्त करून ठरवून दिलेले पीक कर्ज पूर्ण न करणे किंवा शासकीय योजना राबविण्यात झालेल्या दिरंगाईबाबत ॲक्सिस बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, बंधन बँक आणि करूर वैश्य बँक यांना जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांनी नोटीस काढण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

बैठकीत नाबार्ड, ओबीसी महामंडळ, कृषी विभाग आणि जिल्हा उद्योग केंद्र (DIC) यांचा आढावा घेण्यात आला. योजनांची प्रगती, निधी उपलब्धतेची स्थिती तसेच अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींवर चर्चा झाली. कर्ज मंजुरी किंवा नकार प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यावर भर देण्यात आला. ज्या लाभार्थ्यांचे कर्ज नाकारले जाते, त्यांना बँकेने लेखी स्वरूपात नेमके कारण कळविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले. तसेच सर्व बँकांनी जबाबदारीने कामकाज करून उद्दिष्टपूर्ती साध्य करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. प्रगतीचा पुढील आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याचे संकेतही देण्यात आले.

यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक राम वाखार्डे, बँक अधिकारी श्री. कदम , जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र उमेशचंद्र दंडगव्हाळ, ओबीसी वित्त-विकास महामंडळ च्या जिल्हा व्यवस्थापक वृषाली लहारे यांच्या सह सर्व राष्ट्रीयकृत खाजगी व सहकारी बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील कोणत्याही पात्र नागरिकांचे नाव मतदार यादीतून वगळू नये - मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम

सोलापूर, - भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण देशासह महाराष्ट्र राज्यातही मतदार यादींच्या अचूकतेसाठी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमाचा उद्देश म्हणजे प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणे, चुकीची नोंद दुरुस्त करणे तसेच अपात्र नावे वगळणे असा आहे. तरी या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांनी कोणत्याही पात्र मतदाराचे नाव मतदार यादीतून वगळले जाणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केले.

प्रारंभी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी एस. कार्तीकियन यांनी पीपीटीद्वारे सादरीकरण केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम आढावा प्रसंगी श्री. चोक्कलिंगम मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकियन, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत पाटील, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, यांच्या सह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

मुख्य निवडणूक अधिकारी श्री. चोक्कलिंगम पुढे म्हणाले की, या अंतर्गत केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी (BLO) घर भेटी मध्ये नागरिकांना गणना फॉर्म दिल्यानंतर तो त्यांच्याकडून लगेच भरून घ्यावा. नागरिकांनी सोबत

*जिल्ह्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी

*जिल्हाधिकारी एस. कार्तीकियन यांच्याकडून विशेष सखोल पुनरिक्षण कामाचे पीपीटीद्वारे सादरीकरण

*या अंतर्गत जिल्ह्यातील 39 लाख 46 हजार 781 मतदारांपैकी 32 लाख 83 हजार 811 मतदारांचे मॅपिंग पूर्ण

आवश्यक पुरावे दिल्यास तेही घ्यावेत. मतदार यादीतील नावात विसंगती असेल तसेच अविवाहित मतदार असतील अशा ठिकाणी डॉक्युमेंट आवश्यक आहेत. बीएलओ व सुपरवायझर यांचे व्यवस्थित प्रशिक्षण मतदार अधिकाऱ्यांनी घेतले पाहिजे. तसेच बीएलओ नी नागरिकांच्या घरोघरी भेटी देत असताना त्यांच्याशी व्यवस्थितपणे बोलून मतदार यादी गणना माहिती सांगावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

काही ठिकाणी मतदार यादीतील मतदारांचे पत्ते एकाच ठिकाणावर असल्याचे निर्देशनास आलेले आहे, त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या अंतर्गत प्रत्येक घराचे नंबरिंग यंत्रणेकडून करून घ्यावे. मतदार यादीतील दुरुस्तीसाठी प्रत्येक बीएलओ यांच्याकडे ब्लॉक इमरेशन फॉर्म ठेवा. नव्याने अठरा वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांचे मतदार यादीत नोंद करून घ्या. तसेच ज्या ठिकाणी मॅपिंग कमी झालेले आहे अशा ठिकाणी लक्ष ठेवावे व त्या ठिकाणी कामाची गती वाढवावी, अशा सूचना श्री. चोक्कलिंगम यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. कार्तीकियन

म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात मतदार यादींच्या अचूकतेसाठी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबवला जात आहे. जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांची संख्या 11असून लोकसभा मतदारसंघ 2 आहेत (सोलापूर (SC) व माढा). एकूण मतदारसंख्या 39 लाख 46 हजार 781 असून त्यात पुरुष वीस लाख दहा हजार 948, महिला 19 लाख पस्तीस हजार पाचशे पाच व इतर 328 मतदारांचा समावेश आहे. जिल्ह्यात 3723 मतदान केंद्रे कार्यरत असल्याची माहिती त्यांनी दिली. जिल्ह्यात एकूण 77 हजार 86 ब्लर फोटो व चुकीच्या नोंदी प्रकरणांपैकी 72 हजार 648 प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. उर्वरित प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. जिल्ह्याच्या एकूण मतदार संख्येच्या 32 लाख 83 हजार 811 मतदारांचे सखोल पुनरीक्षण झालेले आहे. सरासरी प्रमाण 83.20% इतके आहे.ग्रामीण भागात नोंदणी टक्केवारी 87.20% असून शहरी भागात 72.67% आहे. ग्रामीण भागात BLO व सहाय्यक अधिकाऱ्यांनी समाधानकारक कामगिरी केली असून शहरी भागात अधिक लक्ष देऊन हे प्रमाणही वाढविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी श्री. कार्तीकियन यांनी सांगितले.

# बकरी ईद निमित्त जनावरांच्या वाहतुकीसाठी प्रमाणपत्र बंधनकारक

***बकरी ईद सण शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे**

सोलापूर, :- बकरी ईद हा सण दि. 27 मे 2026 रोजी साजरा होत असून दि. 27 ते दि. 29 मे 2026 या कालावधीत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जनावरांची खरेदी-विक्री होणार आहे. यासाठी बाजार भरविण्यात येणार असून जनावरांच्या वाहतुकीसाठी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी म्हटले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बकरी ईद 2026 निमित्त महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा 1976 व महाराष्ट्र प्रार्य रक्षण सुधारणा कायदा 1995 च्या अमलबजावणीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत निवासी जिल्हाधिकारी श्री. पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य वसीम बुऱ्हाण, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय डॉ. अनिल तांबे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अत्तिक मुलानी, महापालिकेचे मंडई नियंत्रण अधिकारी तपन डंके, पशुसंवर्धन चे डॉ. डी. ए. गिड्डे, सामाजिक संघटनाचे प्रतिनिधी हबीब भाई नदाफ, हाजी कुरेशी, इस्माईल पठाण आदी उपस्थित होते.

श्री. पाटील पुढे म्हणाले की सामाजिक संघटनेच्या वतीने देण्यात आलेल्या सूचना तसेच पशुसंवर्धन विभाग व महापालिकेच्या वतीने बकरी ईद निमित्त केलेल्या तयारी प्रमाणे परस्परात समन्वय ठेवून ईद शांततेत पार पडेल या दृष्टीने प्रयत्न केले जातील व सर्व मुस्लिम धर्मीय सामाजिक संघटनांनी प्रशासनालाही सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

जनावरांची अवैध कत्तल व अवैध वाहतूक रोखण्यासाठी स्थानिक प्रशासन, पोलिस विभाग, पर्यावरण विभाग व पशुसंवर्धन विभाग यांनी समन्वय साधून कार्यवाही करावी. ईद सणाच्या काळात मार्गदर्शक सूचना व शासन निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक असून कायदा व स्वास्थ्य तपासणी बाबत राहणाऱ्या त्रुटीचे निराकरण करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करणे गरजेचे आहे, असे श्री. पाटील यांनी सांगितले.

महापालिकेचे मंडई नियंत्रण अधिकारी श्री. डंके यांनी बकरी ईद निमित्त लहान मोठ्या जनावरांची कुर्बानी देण्यासाठी फॉरेस्ट मटन मार्केट येथे व्यवस्था करण्यात आली असून पाण्याचे टँकरही उपलब्ध करून देण्यात येतील, असे सांगितले.

जिल्हा उपयुक्त पशुसंवर्धन डॉक्टर तांबे म्हणाले की, महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) कायदा, 1995 अंतर्गत गाय, वळू, बैल यांच्या कत्तलीस व वाहतुकीस बंदी आहे. जनावरांची वाहतूक करत असताना जनावरांची वाहतूक अधिनियम, 2001 मधील नियम क्र.16 नुसार वाहतूक प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. प्राणी छळ प्रतिबंधक कायदा, 1960 व वाहतूक अधिनियम 1978 मधील नियम 47 नुसार जनावरांची स्वास्थ्य तपासणी करून न्यायालयीन प्रेषण आवश्यक आहे. ईद सणाच्या वाहतूक करत असताना प्राणी छळ प्रतिबंधक कायदा, 1960 मधील वाहतूक नियमांमधील तसेच पशुसंवर्धन विभाग, पर्यावरण विभाग व पशुसंवर्धन विभाग यांच्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे, असे सांगितले.

अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य श्री. बुऱ्हाण यांनी छोट्या बकऱ्यांना घरीच कुर्बानी देण्याची परवानगी प्रशासनाकडे मागितली. देशाचे जबाबदार नागरिक म्हणून आपण शांततेत सण साजरा करण्याचे त्यांनी आवाहन केले. तसेच हसीफ भाई नदाफ यांनी सोलापूर महापालिकेने मोठ्या जनावर साठी पुढील काळात त्वरित आधुनिक कत्तलखाना निर्माण करण्याची मागणी केली. तसेच अन्य सदस्यांनी बकरी ईद सण शांततेत साजरा करण्यासाठी विविध सूचना मांडल्या.

RNI Reg. No. MAHMAR/2015/64981

आमच्या इन्स्टाग्राम पेजला फॉलो करा,
किंवा
या क्यूआरकोडवर स्कॅन करून फॉलो करा.
किंवा 7387341057, 9322398212 या क्रमांकावर Hi message पाठवून व्हिडिओची लिंक मिळवा.
@PANAAHWEBNEWS

पनाह Weekly

संपादक : रमिजराजा शेख MARATHI / WEEKLY / SOLAPUR/ PANAAH

वर्ष 11 वे अंक- 40 वे मंगळवार, दि. 26 मे ते 1 जून 2026 । मराठी । साप्ताहिक । सोलापूर । पाने 4 । किंमत 2 रु.

VOLUM- 11/ ISSUE NO. 40 / Tuesday, 26 May to 1 June 2026 I MARATHI / WEEKLY / SOLAPUR / PAGES - 4 / PRICE : Rs. 2

# फुकट घर पाहिजे तर झोपड्याच टाकायच्या का..? मुंबईकरांचा संताप आणि हायकोर्टाचा सरकारला झटका!



मुंबई : परराज्यातून मुंबईत येणारे लोक कुठेही झोपड्या टाकतात. त्यांच्या झोपड्यांना मुदतवाढ मिळते. कालांतराने तिथे एसआरएची स्कीम येते आणि त्यांना पक्के घरदेखील मिळते.
पुढे चालून हे घर कोटी-दोन कोटी रुपयांना विकून दुसऱ्या ठिकाणी पुन्हा झोपडी टाकायला यातले अनेक महाभाग मोकळे होतात. दुसरीकडे, काबाडकष्ट करणाऱ्या मध्यमवर्गीय माणसाला मुंबईत घर विकत घ्यायचे फक्त स्वप्न बघता येते. मुंबईत घर घ्यायचे असेल तर कमीत कमी तीन कोटींपासून दहा कोटींपर्यंतची व्यवस्था केल्याशिवाय त्याला घरच घेता येत नाही. ज्या व्यवस्थेने हे दुष्टचक्र निर्माण करून ठेवले आहे, त्यांना देखील मतपेटीच्या राजकारणासाठी ही व्यवस्था बदलून टाकण्याची इच्छाशक्ती नाही.

१९९४-९५ मध्ये युतीचे सरकार आले. त्यांनी १ जानेवारी १९९५ पर्यंतच्या झोपड्यांना पात्र ठरवण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी झोपड्यांची संख्या कमी होती. ज्या हेतूने ही योजना आणली त्याच हेतूने ती राबवली असती तर मुंबईत झोपड्या संपुष्टात आल्या असत्या. मात्र, पुढे प्रत्येक सरकारने मतांचे राजकारण करत या झोपड्यांना मुदतवाढ देण्याचे प्रचारकी हत्यार बाहेर काढले. सतत १६ वर्षे अतिक्रमण करून टाकलेल्या झोपड्या पाडण्याचा कुठल्याही सरकारने प्रयत्न केला नाही. त्यामुळे मुंबईत झोपडी टाकली की फुकटात घर मिळते, हा प्रचार देशभर झाला. त्यातून लोंढे महामुंबईत येऊ लागले. काही दिवसांपूर्वी रेल्वेच्या जागेवरील ४०० झोपड्या पाडण्यासाठी न्यायालयाच्या निर्णयाची मदत घ्यावी लागली. तो निर्णय नसता तर याही झोपड्या पाडण्याची इच्छाशक्ती यंत्रणेने दाखवली नसती. झोपड्या पाडण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर अतिक्रमण करून झोपड्या टाकलेल्या लोकांनी दगडफेक केली. काही पोलिस जखमी झाले. राजकारण्यांना आपल्या मताचे गुलाम केल्यामुळे आपण काहीही करू शकतो, हा माजोरीपणा दगडफेक करणाऱ्यांमध्ये आला. इतक्या कमी प्रमाणात झोपड्या पाडताना पोलिसांना याच लोकांचे दगड खावे लागत असतील तर मुंबईतल्या १६ लाख झोपड्या पाडायचे ठरवले तर काय होईल, याची कल्पनाही करवत नाही.

केंद्र सरकारच्या मालकीच्या ६७३ एकर जागेवर २ लाख झोपड्या आहेत. जोपर्यंत केंद्र सरकार परवानगी देत नाही तोपर्यंत या जागेवरील झोपड्यांचे बायोमेट्रिक, स्ट्रक्चरला नंबर देणे, एनेक्सचर टू करणे या गोष्टीही करता येत नाहीत. तिथे पुनर्वसन फार पुढचा विषय आहे. खासगी मालकीच्या ३,६२१ एकर जागेवर ६ लाख झोपड्या आहेत. या जागा ज्यांच्या आहेत ते एकतर परदेशात आहेत किंवा त्यांना त्यांच्या जागेचे काहीही पडलेले नाही. त्यामुळे या जागेवरील झोपड्या टाकणाऱ्यांना मोकाट रान मिळाले आहे.

मुंबईत ८,३३४ एकर एवढ्या प्रचंड जागेवर झोपड्या आहेत. मोफत घर देण्याच्या अतिरेकी भूमिकेमुळे मुंबईची ही अवस्था झाली आहे. त्यावर मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने सुओ मोटो दाखल केलेल्या याचिकेवर निर्णय देताना जेवढा विचार केला, त्याच्या दहा टक्के तरी सरकार विचार करणार आहे का, हा खरा प्रश्न आहे.

मोफत घरासाठीची झोपडपट्टीवासीयांसाठी असलेली 'कट ऑफ डेट' राज्य सरकारने आता वाढवू नये. सरसकट सर्वांना मोफत घर देण्याच्या धोरणाचा पुनर्विचार करावा, असे परखड मत न्यायालयाने नोंदविले आहे. सरकारकडून मोफत मिळालेली घरे सरकार किंवा एसआरएलाच प्राधान्याने विकता यावीत, थेट खुल्या बाजारात विकू नयेत, अशा तरतुदी करण्याची सूचनाही न्यायालयाने केली. त्याचबरोबर झोपडपट्टीवासीयांना 'त्याच जागी (इन सीटू)' पुनर्वसनाचा अधिकार का द्यावा, असा सवाल करीत अन्य ठिकाणी पुनर्वसन अपेक्षित असल्याचे स्पष्ट मतही निकालपत्रात नोंदविले. सरकारी किंवा खासगी जागेवर वाट्टेल तिथे, वाट्टेल तशी अतिक्रमणे करायची आणि त्या झोपड्या हटवताना त्याच जागी आम्हाला घर द्या, असा आग्रह धरायचा... ही गोष्ट न्यायालयालाच नव्हे तर कोणालाही पटणारी नाही. वांद्र्याच्या झोपड्या पाडल्यानंतर मध्यमवर्गीय मुंबईकरांकडून येणाऱ्या प्रतिक्रिया स्वागताच्या आहेत. किती दिवस परप्रांतातून येणाऱ्यांचे लाड करणार? असे बोचरे सवाल आहेत. मुंबईतील अनेक उपनगरांमध्ये सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांचे 'त्याच जागी पुनर्वसन' का करावे, असा सवाल फक्त न्यायालयाच्याच नाही तर प्रत्येक नागरिकाच्या मनात आहे. प्रत्येक गरीब कुटुंबाला पूर्णपणे मोफत घर देण्याची पद्धत हा दीर्घकालीन उपाय नाही. त्यांच्याकडून बांधकाम खर्चाची काही रक्कम घ्यावी आणि त्यासाठी सरकारने अनुदानित गृहकर्ज योजना उपलब्ध करून द्याव्यात. ज्या कुटुंबांना ईएमआय परवडत नाही, त्यांना 'लिव्ह अँड लायसन्स' तत्त्वावर घरे देण्याचा विचार होऊ शकतो, असे न्यायालयाने नमूद केले आहे.

अनेकदा न्यायालयाचे आदेश आहेत म्हणून सरकार काही निर्णय रेट्न करून घेते. वांद्र्यातील ४०० झोपड्या पाडणे हा त्याचाच एक भाग होता. आता तर इतक्या स्पष्ट शब्दांत न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. आता त्याचे तंतोतंत पालन करून, मुंबईत यापुढे कोणालाही फुकटात घर मिळणार नाही. अतिक्रमण करून झोपड्या टाकणाऱ्यांना तर बिलकुल नाही अशी कठोर भूमिका घेणाऱ्या सरकारला लोक डोक्यावर घेतील. अतिक्रमण करणारे दगडफेक करतील. मात्र कायद्याचे पालन करून राहणारे महाराष्ट्रातले कोट्यवधी नागरिक असा निर्णय घेणाऱ्या सरकारवर फुलंच उधळतील.